# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ५७ / २०२३

वीज जोडणी तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याबाबत

अनिरुध्द भालचंद्र वाकचौरे ........................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, जयसिंगपूर (महावितरण) ........................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- भालचंद्र वाकचौरे

प्रतिवादीतर्फे :- वैभव गोदिल, कार्यकारी अभियंता, जयसिंगपूर
मदन कडाळे, उपकार्यकारी अभियंता, जयसिंगपूर

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १६ जून २०२३

आदेश पारित दिनांक :- १२ जुलै २०२३

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ३० मे २०२३ रोजी दाखल केले.

२.   मंचाने तक्रारदार यांचे गाऱ्हाणे (क्रमांक ४५/२०२२) दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

*"१) तक्रारदार ग्राहकाचे गाऱ्हाणे खालील प्रमाणे मंजूर करणेत येत आहे*

*२) वि.प. विद्युत वितरण कंपनीचे तत्कालीन सहाय्यक अभियंता उपविभाग जयसिंगपूर यांचा AE/JSP/BILLING/2959 दिनांक २५.०७.२०१३ चा ग्राहक क्रमांक २५२५८०४१४८८४ च्या ग्राहकांच्या नावात बदल करणेबाबतचा कार्यलियीन आदेश रद्द करणेत येत आहे व त्या आदेशानुसार बेकरी हाऊस प्रा. लि. संचालक अविनाश महावीर टारे अशी ग्राहकांच्या नावाबाबत झालेली नोंद रद्द करण्यात येत आहे.*

*३) ग्राहक क्रमांक २५२५८०४१४८८४ च्या विद्युत जोडणीबाबत तक्रारदार ग्राहकांचे नाव इको इंडस्ट्रीज श्री. अनिरुध्द भालचंद्र वाकचौरे असे वि.प.क्र.१ व २ वितरण कंपनीने हा आदेश प्राप्त झालेपासून एक महिन्याच्या आत ग्राहक म्हणून पूर्ववत नोंद करावे."*

३.   अपिलार्थींच्या निवेदनातील प्रमुख मुद्दे व दिनांक १६ जून २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीतील महत्वाचे मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी अनिरुध्द भालचंद्र वाकचौरे यांनी नमुद केले की, त्यांचा मीटर त्यांच्या नावे करण्याबाबतच्या तक्रार अर्जाची रितसर सुनावणी मंचामध्ये होऊन त्याचा आदेश प्राप्त झालेला आहे. त्यानुसार अपिलार्थींच्या इको इंडस्ट्रीज श्री. अनिरुध्द भालचंद्र वाकचौरे यांच्या नावे वीज जोडणी झालेली आहे. परंतू मशीनरी बसविणे, वीज लोड (कमी जास्त करणेबाबत) निर्णय घेणे यासाठी वीज जोडणी क्रमांक २५२५८०४१४८८४ तात्पुरत्या कालावधीसाठी बंद करणेकरीता उपकार्यकारी अभियंता, महावितरण, जयसिंगपूर विभाग येथे विनंती अर्ज दिनांक २० मार्च २०२३ रोजी दिला.
- त्यानंतर उपकार्यकारी अभियंता, महावितरण, जयसिंगपूर विभाग यांच्या तोंडी सुचनेनुसार थकीत वीज देयकाची रक्कम रु.२७४००/- चा भरणा दिनांक २९ मार्च २०२३ रोजी केला. दिनांक २९ मार्च २०२३ रोजीच्या पत्रान्वये वीज जोडणी तात्पुरत्या कालावधीसाठी बंद करणेकरीता कळविले. त्यानंतर महावितरणने विविध कारणे उदा. मनुष्यबळाची कमतरता, वादळवारा इत्यादी सांगून कोणतीही कार्यवाही केली नाही.
- वरील दिरंगाईमुळे उपकार्यकारी अभियंता, जयसिंगपूर, उपविभाग यांच्यावर महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ सन २००६ नुसार दफ्तर दिरंगाई कायदा कलम १० प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची महावितरणकडे विनंती केली असता, त्यावरही कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

दिनांक १९ मे २०२३ च्या पत्रानुसार माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत माहिती मागीतली ती सूध्दा देण्यात आली नाही.

➢ अपिलार्थीनी अशी विनंती केली की, सद्यस्थितीत अपिलार्थीच्या नावे असलेली वीज जोडणी तात्पुरत्या स्वरुपात बंद करावी, वा त्यामुळे अपिलार्थीस मानसिक त्रास व आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे याचा विचार व्हावा व अपिलार्थीस न्याय देण्यात यावा.

४. प्रतिवादी महावितरणने त्यांच्या दिनांक १४ जून २०२३ च्या उत्तरात नमुद केलेले मुख्य मुद्दे व दिनांक १६ जून २०२३ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेतः

➢ अपिलार्थीने मंचाकडे दाखल केलेली केस क्र.४५ / २०२२ ही ग्राहक क्रमांक २५२५८०४१४८८४ हा बेकरी हाऊस प्रायव्हेट लिमिटेड प्रोप. अविनाश महावीर तारे यांच्याकडून इको इंडस्ट्रिज प्रोप. अनिरुध्द भालचंद्र वाकचौरे यांच्या औद्योगिक वीज जोडणीच्या नावातील बदलाशी संबधीत होती. मंचाच्या दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या आदेशान्वये दिनांक २ मार्च २०२३ रोजी नाव बदलाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

➢ अपिलार्थीने दिनांक २० मार्च २०२३ रोजी प्रतिवादींना ग्राहक क्रमांक २५२५८०४१४८८४ चा वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्याबाबत विनंती केली. अपिलार्थीच्या विनंतीवरुन वीज पुरवठा खंडीत करण्यासाठी गेले असता, श्री. दिपक माने (सध्याचे भोगवटादार) यांनी वीज पुरवठा खंडीत करण्याच्या कृतीस आक्षेप घेतला. तदनंतर त्यांनी त्यांच्या वकीलामार्फत दिनांक १७ एप्रिल २०२३ रोजी नोटीस पाठवली. सदर नोटीस लीगल डिपार्टमेंट कोल्हापूर यांच्याकडे दिनांक १० मे २०२३ च्या पत्रान्वये कायदेशीर सल्लयासाठी पाठविली. ज्युनिअर लॉ ऑफीसर कोल्हापूर यांनी त्याबाबत स्थानिक कार्यालयाला कायदेशीर सल्ला कळविला. कायदेशीर सल्ला श्री. चेतन दिपक माने व तसेच अपिलार्थींना दिनांक २६ मे २०२३ रोजी पत्राने कळविला.

➢ सर्व बाबींचा विचार करुन अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक ८ जून २०२३ रोजी तात्पुरत्या स्वरुपात बंद केला.

➢ प्रतिवादींनी असे निदर्शनास आणून दिले की, माननीय विद्युत लोकपाल यांच्यासमोरील कामकाज हे मंचाकडून गाऱ्हाणेचे निवारण न झाल्याने बाधित झालेल्या ग्राहकाला माननीय विद्युत लोकपालांकडे अभिवेदन सादर करता येते. अपिलार्थीने दिनांक २० मार्च २०२३ रोजी प्रतिवादींना ग्राहक क्रमांक २५२५८०४१४८८४ चा वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्याबाबत विनंती अर्ज केला, सदर अर्ज गाऱ्हाणे स्वरुपात मंचापुढे आली नव्हता. अपिलार्थीनी ही गाऱ्हाणे / तक्रार

माननीय विद्युत लोकपालांकडे अभिवेदनाद्वारे मांडली आहे, ती अपिलेट कोर्टाकडे म्हणजे माननीय विद्युत लोकपालांकडे थेट करता येत नाही. सबब, अपिलार्थीचे अभिवेदन ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०20 मधील विनियम १९.१ नुसार माननीय विद्युत लोकपाल अभिवेदन स्वीकारू शकत नाही. प्रतिवादींनी विनंती केली की अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे, तसेच, मंचाचा आदेश २१ फेब्रुवारी २०२३ रोजीचा आहे व तो माननीय विद्युत लोकपाल, यांच्याकडे अपिलार्थी ६0 दिवसांत येणे अपेक्षीत होते, परंतू अपिलार्थींनी अभिवेदन ३० मे २०२३ रोजी केले, म्हणजे अभिवेदन सादर करण्यास जवळ जवळ ३७ दिवसांचा विलंब झाला आहे, म्हणून सदर अभिवेदन नियमानुसार स्वीकारू शकत नाही.

- अपिलार्थींचा विद्युत पुरवठा तात्पुरत्या स्वरूपात दिनांक ८ जून २०२३ रोजी बंद करण्यात आला आहे.

## विश्लेषण व निर्णय

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थींनी व प्रतिवादींनी अभिवेदनात नमुद केलेले मुद्दे सुनावणी दरम्यान पुनश्चः उपस्थित केले. उपलब्ध माहितीवरून अपिलार्थींचा वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरूपात दिनांक ८ जून २०२३ रोजी बंद करण्यात आला असे दिसून येते.

६. अपिलार्थींनी दिनांक ३० मे २०२३ रोजी दाखल केलेल्या अभिवेदनात असे नमुद केले की, मंचाच्या दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या आदेशाप्रमाणे प्रतिवादींनी वीज जोडणी अपिलार्थींच्या नावावर पुर्ववत केली व मंचाच्या आदेशाचे पालन केलें त्याबद्दल अपिलार्थीने प्रतिवादींना धन्यवाद दिले. त्यानंतर अपिलार्थींने दिनांक २० मार्च २०२३ रोजी प्रतिवादींना ग्राहक क्रमांक २५२५८०४१४८८४ चा वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याबाबत विनंती केली. त्याबाबतचे अभिवेदन अपिलार्थींनी मंचाकडे न जाता परस्पर ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०20 मधील विनियम १९.१ नुसार माननीय विद्युत लोकपाल यांच्याकडे दाखल केले. ते विनियमाच्या अधीन नाही. त्याबाबत विनियम १९.१ खालील प्रमाणे आहे.

*१९. विद्युत लोकपालासमोरील कामकाज*

*१९.१ मंचाकडून गाऱ्हाण्याचे निवारण न झाल्याने बाधित झालेल्या ग्राहकाला, थेट किंवा उचित प्राधिकृत प्रतिनिधीच्या माध्यमातून, मंचाच्या आदेशाच्या दिनांकापासून साठ (६०) दिवसांच्या आत, गाऱ्हाण्याच्या निवारणासाठी विद्युत लोकपालांकडे अभिवेदन सादर करता येईल.*



म.वि.नि.आ.

*परंतू असे की, सदर कालावधीत अभिवेदन दाखल न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत जर विद्युत लोकपालाची खात्री झाली तर सदर साठ (६०) दिवसांचा कालावधी संपून गेल्यावर तो असे अभिवेदन विचारार्थ स्वीकारु शकेल.*

७. सबब, अपिलार्थींचे अभिवेदन विनियमानुसार नाही. तसेच अभिवेदन दाखल करण्यास झालेला ३७ दिवसांच्या विलंबास सबळ कारण नसल्या कारणास्तव माफ करण्यात येत नाही व अपिलार्थींचे अभिवेदन फेटाळण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)